कुपोषण निर्मुलन, माझी कन्या भाग्यश्री, बेटी बचाओ- बेटी पढाओ, योजनेच्या जाहीरात प्रसिध्दीच्या खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महिला व बाल विकास विभाग,

शासन निर्णय क्रमांक:- एबावि-२०१८/प्र.क्र.१९९/का.०६

नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,
मादाम कामा मार्ग,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय,मुंबई-४०००३२
दिनांक :- ३० मार्च, २०१९

वाचा :- (१) महिला व बाल विकास विभागाचे पत्र क्र. एबावि-२०१८/प्र.क्र.१९९/का.०६, दिनांक २८ जानेवारी २०१९
(२) माहिती व जनसंपर्क विभागाचे जाहिरात प्रसिध्दीचे दिनांक १८ जानेवारी २०१९ चे कामकाज आदेश
(३) महिला व बाल विकास विभागाचे पत्र क्र. एबावि-२०१८/प्र.क्र.१९९/का.०६, दिनांक १६ मार्च २०१९

शासन निर्णय :-

कुपोषण निर्मुलन, माझी कन्या भाग्यश्री, बेटी बचाओ-बेटी पढाओ, या शासन राबवित असलेल्या योजनांची इलेक्ट्रॉनिक्स मिडिया व प्रिंट मिडिया मार्फत प्रसिध्दी देण्यासाठी माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडून त्यांच्या पॅनलवर असलेल्या अधिकृत एजन्सीकडून विविध माध्यमांचा आधार घेऊन प्रसिध्दी देण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याबाबत माहिती व जनंसपर्क विभागास कळविण्यात आले होते.

२. पोषण अभियान हा मा.प्रधानमंत्री यांचा देशातील समग्र पोषणावर आधारित महत्वपुर्ण कार्यक्रम महिला व बाल विकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेमार्फत राबविण्यात येत आहे . पोषण अभियानातंर्गत कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी विविध प्रसिध्दी माध्यमाव्दारे व्यापक प्रसिध्दी मोहिम राबविण्याबाबत केंद्र शासनाने सूचना दिलेल्या आहेत. त्यासाठी प्रत्येक जिल्हयात रुपये १९.०० लाख याप्रमाणे राज्यातील सर्व जिल्हयात रुपये ६८४.०० लाख खर्च करण्यास केंद्र शासनाने मंजूरी दिलेली आहे. पोषण अभियान कार्यक्रमाअंतर्गत केंद्र शासनाने दिलेल्या सूचनेनुसार प्रसिध्दी मोहिम निधी अभावी तसेच योजना नवीन असल्यामुळे पुर्णपणे प्रसिध्दी आराखडा तातडीने राबविणे विभागास शक्य झालेले नव्हते. त्यामुळे एकत्रित राज्यस्तरावरुन प्रसिध्दी मोहिम राबविण्याचा विभागाने निर्णय घेतला होता.

३. आयुक्त,महिला व बाल विकास ,पुणे या कार्यालयाकडून राबविण्यात येणा-या योजनांना व्यापक प्रसिध्दी देण्यासाठी २२३५ A९०१ ,जनजागृती प्रसिध्दी, प्रशिक्षण आणि मुल्यमापन-२६ जाहिरात व प्रसिध्दी हे लेखाशिर्ष उपलब्ध आहे. अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्याकडे यापूर्वी झालेल्या चर्चेच्यावेळी विभागाने प्रसिध्दी मोहिम विभागाकडे स्वतंत्र लेखाशिर्ष व त्याखाली मोठया प्रमाणात निधी अर्थसंकल्पित करण्यात येत असल्यामुळे सदर लेखाशिर्षामधुन खर्च करावा अशा सूचना विभागास देण्यात आलेल्या होत्या.

४. सन २०१८-१९ मध्ये २२३५ A९०१ ,जनजागृती प्रसिध्दी, प्रशिक्षण आणि मुल्यमापन-२६ जाहिरात व प्रसिध्दी हया लेखाशिर्षाखाली रुपये १५००.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे. आयुक्त एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई व आयुक्त,महिला व बाल विकास ,पुणे कार्यालयाकडून राबविण्यात येणा-या योजनांसाठी राज्यस्तरावरुन प्रसिध्दी मोहिम राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे. कुपोषण निर्मुलन, माझी

कन्या भाग्यश्री,बेटी बचाओ-बेटी पढाओ, योजनेच्या एकत्रित जाहीरात प्रसिध्दीकरिता प्रसिध्दीचा आराखडा विभागाच्या विनंतीनुसार माहिती व जनसंपर्क विभागाने तयार करुन त्यांच्या पॅनलवर असलेल्या अधिकृत खालील एजन्सीकडून विविध माध्यमांचा आधार घेऊन प्रसिध्दी मोहिम राबविलेली आहे. संबधित एजन्सीकडून राज्यातील जिल्हयात प्रसिध्दी मोहिम राबविल्याचे आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई यांनी प्रमाणित करुन देयके अदा करण्यासाठी शासनाच्या मान्यतेने आयुक्त,महिला व बाल विकास ,पुणे कार्यालयास सादर केलेली आहेत.

अ.क्र.	एजन्सीचे नाव	सोपविण्यात आलेले कामकाज (अनुज्ञेय रक्कम)
१	मे.स्पॅन कम्युनिकेशन,मुंबई	रुपये ६९,९०,०००/-
२	मे.स्पॅन कम्युनिकेशन,मुंबई	रुपये १४,९५,०००/-
३	मे.स्पॅन कम्युनिकेशन,मुंबई	रुपये ८३,९५,०००/-
४	मे.स्पॅन कम्युनिकेशन,मुंबई	रुपये ८३,९५,०००/-
५	मे.ब्लयु ओशियन मिडीया प्रा.लि.मुंबई	रुपये २४,९९,३८८/-
६	मे.दत्तात्रय ॲडव्हटायझिंग कं.अमरावती	रुपये ८३,९३,८१२/-
७	मे.संचालक,जय महाराष्ट्र	रुपये ९०,८७९/-
	एकुण	**रुपये ३,६२,५९,०७९/-**

४. उपरोक्त एजन्सीनी योजनांच्या प्रसिध्दीचे कामकाज पुर्ण केलेले असल्याचे आयुक्त,ए.बा.वि.सेवा योजना,नवी मुंबई यांनी प्रमाणित केलेले असल्यामुळे दिनांक १६ मार्च २०१९ च्या पत्रान्वये शासनाची मान्यता देण्यात आलेली होती. तथापि जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे यांनी देयके पारीत करताना उपरोक्त एजन्सी यांना देयके अदा करण्यास प्रशासकीय मान्यता विभागाने प्रदान केलेल्या आदेशाची मागणी आयुक्त,महिला व बाल विकास ,पुणे कार्यालयाकडे केलेली आहे.यास्तव या शासन निर्णयान्वये संबधित उपरोक्त एजन्सींना त्यांनी सादर केलेली देयके एकुण रुपये ३६२.५९ लाख (रुपये तीन कोटी ,बासष्ट लाख ,एकोणसाठ हजार फक्त) अदा करण्यास शासन प्रशासकीय मान्यता देत आहे. उपरोक्त खर्च लेखाशिर्ष २२३५ A९०१ ,जनजागृती प्रसिध्दी, प्रशिक्षण आणि मुल्यमापन- २६ जाहिरात व प्रसिध्दी याखाली करण्यात आलेल्या सन २०१८-१९ मधील तरतुदीमधुन भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०१९०४०५११०४०७७१३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Lalsing Ramchandra Gujar

Digitally signed by Lalsing Ramchandra Gujar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c3eb5f6c3e4855c5793924cf2a352b44266d360de02a2494e1a64477bf79d694, serialNumber=4ca059ab7b8d64aaf749fe58e0a714a015f521cb28fd2204e49a4d81f12a5745, cn=Lalsing Ramchandra Gujar
Date: 2019.04.05 14:36:45 +05'30'

(ला.रा.गुजर)
सह सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव,राजभवन,मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई

३. मा.मंत्री/मा.राज्यमंत्री,महिला व बाल विकास,मंत्रालय,मुंबई
४. मा.मुख्य सचिव,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
५. अपर मुख्य सचिव (नियोजन),नियोजन विभाग,मंत्रालय,मुंबई
६. प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग,मंत्रालय,मुंबई
७. सचिव (म.व बा.वि.) यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक,मंत्रालय,मुंबई
८. आयुक्त,एकात्मिक बाल विकास सेवा योजना,नवी मुंबई
९. आयुक्त,महिला व बाल विकास,पुणे
१०. महासंचालक (माहिती व प्रसिध्दी)मंत्रालय,मुंबई
११. सर्व विभागीय आयुक्त
१२. सर्व जिल्हाधिकारी
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद)
१४. अधिदान व लेखाधिकारी,मुंबई
१५. निवासी लेखा परिक्षा अधिकारी,मुंबई
१६. महालेखापाल (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र मुंबई/नागपूर
१७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८. जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे
१९. सर्व महिला व बाल विकास अधिकारी (जिल्हा परिषद)
२०. सर्व बाल विकास प्रकल्प अधिकारी (ग्रामीण/नागरी/आदिवासी प्रकल्प)
२१. निवड नस्ती/का.६